संत तुकाविप्र रचीत  कृष्णा नदीची आरती



औट कोटी तीर्था । वंद्य तू जननी ॥
पवन स्पर्शे जडमूढ । पावन तुझेनी ॥
जलरुपी अवतार । हरीहरा वनी ॥
कलीयुगी हे वस्ती । तुझ्या कृपेनी ॥

जयदेवी जयदेवी । जय श्री कृष्णे माते ॥
ओवाळू आरती।  हरीहर  सुख सरीते ॥
॥जयदेवी जयदेवी ॥१॥

स्मरणमात्रे पावन ।  करीसी तू सकळा ॥
अनंत नामे तुझी ।  अनंतशा लीला ॥
तुझेनी योगे । पापे होती धुरळा ॥
म्हणोनि माझी वाणी । हीन दीन उद्धरा ॥

जयदेवी जयदेवी । जय श्री कृष्णे माते ॥
ओवाळू आरती।  हरीहर  सुख सरीते ॥
॥जयदेवी जयदेवी ॥२॥

श्री कृष्णे माऊली । हे तुजला विनंती ॥
हीन दीन सुख हे माझे ।  राहो तव चित्ती ॥
विश्वास नेमे । दे क्षमा शांती ॥
तुकाविप्र कृपा । करावी पूर्ती ॥

जयदेवी जयदेवी । जय श्री कृष्णे माते ॥
ओवाळू आरती।  हरीहर  सुख सरीते ॥
॥जयदेवी जयदेवी ॥३॥